# प्रेस नोट

**दक्षिण सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा मुंबई यांनी सायबर गुन्हयामधील अनेक बॅक खाते चा पुरवठा करणारा एका इसमास मोहम्मद अली रोड,मुंबई येथुन अटक करुन सुमारे ३३ वेगवेगळया बॅंकेचे डेबिट कार्ड १२ वेगवेगळया बॅंकेचे चेक बुक हस्तगत केले बाबत.**

..........................................................................................................................................

दिनांक २५/११/२०२४ रोजी कुलाबा येथे राहणा-या तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन दक्षिण सायबर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र १४३/२०२४ कलम ३१८(४),३१९(२),३३६(२),३३६(३),३४०(२),६१(२) भारतीय न्याय संहिता सह ६६(क)(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.यातील नमुद फिर्यादी यांना आरोपीनी दि. १९/०८/२०२४ ते १६/११/२०२४ या कालावधी दरम्यान व्हॉटसअॅप क्रमांक 9748779379, +1(213)245-3081 तसेच https://stock.pluprostocks.com/ लिंक पाठवुन या आय.डी. चा वापर करुन फसवणुक करण्याचे इरादयाने फिर्यादीला स्टॉक मार्केट ट्रेडिंग करण्याकरिता मॅसेज पाठवुन फिर्यादी यांची 11,16,61,161.73/- रुपायांची फसवणूक करण्यात आली होती.

फिर्यादी यांनी वेगवेगळया बॅक खात्यावर २२ ट्रान्झक्शनद्वारे पैसे पाठविले होते. त्यापैकी पैस पाठविलेल्या ICICI Bank बॅंकेचे खाते व IDFC BANK चे बॅंक खात्याचा तपास करीत असतांना IDFC BANK चे बॅंकेतुन ६ लाख रुपये एका महिलेने चेकद्वारे काढल्याचे दिसून आले व पैसे काढतांना KYC म्हणून पॅनकार्ड दिल्याचे दिसून आले. दिनांक २६/११/२०२४ रोजी नमुद महिलेचा शोध घेवून तिच्याकडे केलेल्या तपासामध्ये तिने इसम नामे कैफ इब्राहिम मन्सुरी वय ३१ वर्ष याचे सांगण्यावरून चेकद्वारे पैसे काढल्याचे सांगितले. त्यानंतर नमुद इसमास ताब्यात घेतले असता त्याच्या ताब्यात नमुद गुन्हयात वापरलेल्या ५ बॅंक खात्याची डेबिट कार्डस मिळुन आली. सदर बॅंकखात्यामध्ये फसवणुकीचे एकुण- ४४ लाख रुपये वळते करण्यांत आल्याचे दिसुन आल्याने नमुद इसमास अटक करण्यात आली आहे.

**अटक आरोपी याचे नाव :-**

१) कैफ इब्राहिम मन्सुरी वय ३१ वर्ष रा.ठी.१०१,नुर पॅलेस, ५ वा माळा ,मोहम्मद अली रोड ,मुंबई ४००००३

**जप्त मालमत्ताा :-**३३ वेगवेगळया बॅकेचे व खातेधारकांचे डेबीट कार्ड, १२ वेगवेगळया बॅंकेचे व खातेधारकांचे चेकबुक

तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की शेअर ट्रेडिंग गुंतवणूक व इतर जास्त परतावा/पगार मिळवून देण्यासाठी येणारे कॉल व मॅसेजेस, डिजिटल अॅरेस्ट बाबत कॉल येणे, फेडेक्सचे पार्सल आल्याबाबत कॉल येणे, ऑनलाईन लॉटरी लागणे यासारख्या आमिषाला बळी पडू नये. अशाप्रकारची ऑनलाईन सायबर फसवणूक झाल्यास १९३० या क्रमांकावर तात्काळ तक्रार करावी.

अशा प्रकारे सायबर गुन्हेगारांना गुन्हे करण्यासाठी लागणारी बॅक खाते पुरविणारे इसम पकडून त्याची सर्व खाती गोठवून सायबर गुन्हेगारीचा बिमोड करण्यास दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे,गुन्हे शाखा, मुंबई यांना यश मिळाले आहे. सदरची उत्कृष्ट कारवाई मा.पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर,मा.विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा.सह पोलीस आयुक्त, गुन्हे, मुंबई श्री. लखमी गौतम, मा.अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मुंबई श्री. शशिकुमार मिना, मा.पोलीस उप आयुक्त (सायबर) श्री.दत्ता नलावडे, मा.सह पोलीस आयुक्त,सायबर,श्री राजेंद्र शिरतोडे मा.वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री नंदकुमार गोपाळे, पोलीस निरिक्षक सुरेश भोये,सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन त्रिमुखे,पो.ह.क्र ३३८८६/ खान,पो.ह.क्र ०४१०६३/गलांडे व पथक यांनी केली.